म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. २५२२.

Kalpana
२५२२

# कॅप्टन लक्ष्मी

IRBK-0102522
IRBK-0102522

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. २३२



वा. क्र. २५२२.

# जय हिंद
# कॅप्टन लक्ष्मी

२५२२
५।६।६६
[illegible] ठाणे, [illegible],
क्र. २५२२ नों. दि. ..........
वि. आ. वा. ..................

लेखक
गजानन काशीनाथ रायकर
पांडुरंग श्रीधर टिल्लू

IRBK-0102522

जयहिन्द प्रकाशन
रामकृष्ण बुकडेपो
गिरगांव-मुंबई
मूल्य चार आणे

१८५७ सालीं भारताच्या मुक्तीसाठीं
पहिल्या स्वातंत्र्य युद्धांत प्राणार्पण
केलेल्या झांशीच्या राणी लक्ष्मीस—



## जय हिन्द !

१८५७ सालीं पहिल्या स्वातंत्र्ययुद्धांत अवघ्या वीस वर्षांच्या झांशीच्या राणीनें ग्वाल्हेरच्या किल्ल्यावरून इंग्रजांशीं प्रचंड लढा केला, आणि त्या लढ्यांत ती अखेर मृत्यू पावली. राणी मेली पण तिचें तेज अमर आहे. झांशीच्या राणीचे अनेक अवतार या देशांत विजयी होत आहेत. कॅ. लक्ष्मी या झांशीच्या राणीचा एक आधुनिक अवतारच आहेत!

देशासाठीं स्वतःच्या संसाराची होळी करणाऱ्या या 'बंडखोर' वीरांगनेचें जीवनचरित्र अद्भुतरम्य आणि स्फूर्तिदायक आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा लढा चालविण्यासाठीं त्या आज परत आपल्यांत आल्या आहेत. नेताजी सुभाषपुढें त्यांनीं प्रतिज्ञा केली आहे कीं—

**"स्वातंत्र्य मिळेपर्यंत आराम नाहीं!"**

अर्थात् त्यांचें उत्तर आयुष्यही तितकेंच क्रांतिकारक ठरेल!

कॅ. लक्ष्मीचें चरित्र, मराठींत पुस्तकरूपानें प्रथमच प्रसिद्ध होत आहे. या लिखाणांत नवयुग, नवशक्ति, विविधवृत्त, मौज, लोकमान्य इत्यादि वृत्तपत्रांतील लिखाणाचा आम्हाला फार उपयोग झाला.

मुंबई, ३०।४।१९४६ — ग. का. रायकर, पां. श्री. टिल्लू

आवृत्ति
पहिली
१९४६
सर्वाधिकार
सुरक्षित
मुखपृष्ठ
दीनानाथ
दलाल
मुद्रक
र. रा. बखले
मुंबई वैभव
छापखाना
प्रकाशक
वि. र. वाम
रामकृष्ण
बुकडेपो
मुंबई ४

## स्वामिनाथन् कुटुंब ☆ ★ १

स्वामिनाथन् नांवाच्या कुटुंबाचा मद्रासला एक भव्य प्रासाद आहे. कलावंतांशीं परिचय, त्यांचा मानसन्मान, त्यांच्याविषयीं आदर बाळगणें व त्यांच्या कलेशीं समरस होणें इत्यादि बाबतींत हें स्वामिनाथन् कुटुंब पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. त्यामुळें चित्रकार, संगीतज्ञ, कवि इत्यादि अनेक प्रकारच्या कलावंतांशीं या स्वामिनाथन् कुटुंबाचा नेहमींच संबंध येत असतो. अशा या श्रीमंत व हौशी घराण्यांत आणि सर्वांच्या कोडकौतुकांत कॅ. लक्ष्मी वाढलेली आहे. तिचा जन्म १९१४ सालीं मद्रासमध्यें झाला.

लक्ष्मीचे वडील डॉ. एस्. स्वामिनाथन् हे एक मलबारी ब्राह्मण होते. मद्रासमधील पहिल्या दर्जाच्या कायदेपंडितांत ते मोडत असत. इंग्लंडमधील एका विद्यापीठाची एल्एल्. डी. ही पदवीही त्यांनीं संपादन केली होती. वकिलींत त्यांनीं भरपूर पैसा मिळविला. लक्ष्मीची आई अम्मू या मद्रासमधील कॉंग्रेसच्या एक कार्यकर्त्या असून १९४२ च्या चळवळींत त्यांना कांहीं दिवस तुरुंगवासही घडला होता. एका प्रतिष्ठित व श्रीमंत नायर कुळांत त्यांचा जन्म झालेला असून आज जरी त्यांना पन्नाशीची झुळुक लागलेली असली तरी उच्चपदस्थ मद्रासी समाजांत त्यांचें पूर्वीचें स्थान अजूनही कायम राहिलें आहे. या अम्मू म्हणजे मलायन संस्कृतीचें एक प्रतीक स्वरूप आहे. मध्यवर्ती कायदेमंडळाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकींत त्या मद्रास शहरातर्फे निवडून आलेल्या आहेत.

कॅ. लक्ष्मी ही सर्वांत थोरली मुलगी. दुसरी मुलगी मृणालिनी. अहमदाबादचे धनाढ्य गिरणीमालक शेट अंबालाल साराभाई यांच्या मुलाशीं मृणालिनीचा विवाह झालेला आहे. लक्ष्मीला दोन भाऊही

आहेत. त्यांपैकीं गोविंदराव हे मद्रासच्या तरुण वकिलांपैकीं एक प्रमुख वकील म्हणून प्रसिद्ध असून त्यांची प्रॅक्टिस उत्तम चालली आहे. दुसरे बंधु श्री. कृष्णन् हे कलकत्त्याच्या सप्लाय डिपार्टमेंटमध्यें नोकरीला आहेत. हे बंधुद्वय लाहोरच्या लक्ष्मी इन्शुअरन्स कंपनीचे संचालक दे. भ. पंडित संतानम् यांचे जांवई आहेत. पं. संतानम् हेही मूळचे मद्रासचेच !

वडिलांचा प्रेमळपणा लक्ष्मीला फार दिवस लाभला नाहीं. कारण लक्ष्मी बालिका असतांनाच ते तिला सोडून परलोकीं गेले. परंतु तिच्या आईनें तिच्या सुखासाठीं कांहींही करावयाचें शिल्लक ठेवलें नाहीं.

★

## शिक्षण ★ ★ ★ २

कु. लक्ष्मी, ही शाळेंत तल्लख बुद्धीची चुणचुणीत मुलगी म्हणून ओळखली जाई. तिला टेनिस खेळण्याची व मोटार चालवायची हौस फार ! ती मोटार इतक्या भरधांव वेगानें चालवायाची कीं, पोलिस अधिकाऱ्यांना कित्येकदां तिची मोटार अडवून ठेवावी लागे. एकदां तर ती आपली मोटार भरधांव वेगानें चालवीत असतांना उलथून पडली. दैव बलवत्तर म्हणूनच लक्ष्मी त्या प्राणांतिक संकटांतून बचावली. सारे लोक घाबरून गेले. परंतु अगदीं कांहींच झालें नाहीं अशा रीतीनें लक्ष्मी उठली आणि थोड्या वेळानें टेनिस खेळावयास निघून गेली.

लक्ष्मी इंटरच्या वर्गांत होती. शिक्षण व्यवस्थित सुरू होतें. कॉलेजमध्यें तिची तडफदार मूर्ति सगळीकडे चपलतेनें हलत असे. ही चपलताच इतर तरुण सहकाऱ्यांमध्यें तिच्याविषयीं एक प्रकारचें भीतियुक्त प्रेम निर्माण करीत असे.

लक्ष्मीच्याभोंवतीं कॉलेजांत नेहमींच घोळका असे. परंतु तिच्या बेदरकार वृत्तीमुळें सर्वजण तिला वचकूनच असत. इंटर पास झाल्या-नंतर तिला विवाहासाठीं अनेकांनीं मागण्या घातल्या. लक्ष्मीशीं विवाह व्हावा, अशी आशा उराशीं बाळगून तशी खटपट करणाऱ्यांत कित्येक सनदी अधिकारीही होते. परंतु लक्ष्मीनें पुढें शिक्षण घेण्याचें ठरविल्यामुळें त्यांची दारुण निराशा झाली. लक्ष्मीनें कांहीं दिवस एका स्वदेशी स्टोअर्समध्यें काम केलें व नंतर आपलें नांव मद्रास मेडिकल कॉलेजांत दाखल केलें. या कॉलेजांत वैद्यकीय शिक्षण घेत असतांनाच लक्ष्मी इंग्लंडला गेली होती. सुमारें चार महिने ती तेथें होती. त्या काळांत कित्येक नव्या मैत्रिणी तिला मिळाल्या. या मैत्रिणींपैकींच सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती देविकाराणी ह्या एक होत.

प्रवासाची आवडही तिला फार होती, तर कधीं कधीं, एखाद्या वटवृक्षाखालीं एखाद्या तत्त्वज्ञाचें व्याख्यान ऐकत बसलेलीहि ती पहावयास मिळे. स्वतः ती तत्त्वज्ञ नव्हती. परंतु तत्त्वज्ञानांत तिला एक प्रकारची गोडी वाटत असे. टेनिसच्या खेळांत तिची साथीदार म्हणून मालती पटवर्धन नांवाची एक महाराष्ट्रीय मैत्रीण नेहमीं असावयाची.

★

## वैवाहिक जीवन ★ ★ ३

लक्ष्मीनें कित्येक लक्ष्मीपुत्रांची मागणी झिडकारली होती. परंतु निसर्गापुढें तिचें कांहीं चाललें नाहीं. त्यानें योग्य वेळीं लक्ष्मीच्या हृदयांत प्रणयभाव जागृत केल्यामुळें एकेकाळीं विवाहाला नाकबूल असणारी लक्ष्मी एकाएकीं बदलली. तारुण्योन्माद तिला असह्य होऊं लागला. शेवटीं तिचा अभ्यासक्रम पुरा होण्यापूर्वींच तिचा विवाह टाटा एअर सर्व्हिसमधील पायलट श्री. बी. के. नंजुंदराव यांच्याशीं

१९३६ सालीं झाला. श्री. नंजुंदराव हे एक देखणे वैमानिक असून त्यांची चालचलणुक आदबशीर आहे.

मद्रासमध्यें हें लग्न मोठ्या थाटामाटांत झालें. या लग्नांत वधूवरांना अनेक मौल्यवान् वस्तु भेटीदाखल मिळाल्या होत्या. या लग्नाच्या मेजवान्या, समाजांत बरेच दिवस झडत होत्या. मद्रासमधील सर्वधर्मीय प्रसिद्ध नागरिक या लग्नसमारंभाला उपस्थित होते.

लग्नानंतर हें दांपत्य स्थायिक होण्यासाठीं मुंबईला दाखल झालें. वैमानिकाचें धाडसी जीवन लक्ष्मीनें देखील पतीबरोबर अनुभविलें. वैवाहिक जीवनांतील अनेक रम्य रात्री त्यांनीं विलासांत घालविल्या.

टाटांच्या एअरमेलची वाहतुक करण्याचा, पायलट श्री. राव यांचा क्रम चालू असतांच, मध्येंच काय झालें कोणास ठाऊक, पण लक्ष्मीचे पतीबरोबर मतभेद झाले. हे मतभेद मिटूं शकले नाहींत आणि ती पतीपासून दूर झाली. लक्ष्मीचा विवाह ही एक आश्चर्यजनक घटना ठरून तिनें रचलेलीं वैवाहिक जीवनाचीं व सौख्याचीं स्वप्नें अपुरींच राहिलीं !

लक्ष्मी मद्रासला परत आली आणि १९३८ सालीं वयाच्या २४ व्या वर्षीं मद्रास विश्वविद्यालयाच्या एम्. बी. बी. एस्. च्या परीक्षेंत ती उत्तीर्ण झाली. मेडिकल कॉलेजमधील एक विद्यार्थी इब्राहीम यांचा लक्ष्मीशीं परिचय झाला आणि त्या परिचयाचें प्रेमांत रूपांतर झालें. आस्ते आस्ते अशा बातम्या उठूं लागल्या कीं लक्ष्मीचें आणि तिच्या पायलट पतीचें बिनसलें असून, एक नवा दोस्त तिनें गांठला आहे. नंतर नंतर, सर्व मद्रासच्याच चर्चेचा हा विषय होऊन बसला आणि सगळीकडे त्याबद्दल कुतुहल निर्माण झालें. शेवटीं लक्ष्मीनें नंजुंदरावाशीं घटस्फोट घेतला.

★

## सिंगापुरांत ★ ★ ★ ४

इब्राहीमनें ब्रिटिश लष्करांत नोकरी धरली. थोड्याच दिवसांत जपानशीं लढण्यासाठीं त्यांना सिंगापुरांत जावें लागलें. इब्राहीम सिंगापूरला आहेत असें कळतांच १९४० मध्यें लक्ष्मीही तिकडे गेली. तिनें सिंगापुरांत दवाखाना उघडून प्रॅक्टिस चालू केली.

१९४२ मध्यें जपान्यांनीं सिंगापूर ताब्यांत घेतलें तेव्हां तेथील सर्व लोक इतस्ततः पळत होते. लक्ष्मीला सिंगापूर सोडून जाण्याचा हुकूम देण्यांत आला होता. परंतु लक्ष्मीनें तो हुकूम धुडकावून लावला.

३१ मार्च १९४२ रोजीं सिंगापूरला हिंदी स्वातंत्र्य संघाची स्थापना झाली. या संघाला जपानचा पूर्ण पाठिंबा मिळाला. संघाचे सभासद वाढूं लागले. लक्ष्मीच्या आयुष्यांत याच वेळीं क्रांति झाली. विलासी वातावरणांतून ती वीरशाली व त्यागी वातावरणांत शिरली. तिच्या सामर्थ्यशाली बेदरकार मनोवृत्तीचा योग्य विकास याच वेळीं झाला. संघाचें काम ती अहोरात्र करूं लागली.

हिंदी स्वातंत्र्य संघानें आझाद हिन्द फौज स्थापन करण्याचें ठरविलें. हिंदी स्त्री–पुरुष सैनिक म्हणून नांवें नोंदूं लागले होते. जो जो भेटेल त्याच्याशीं चर्चा करून सैनिक मिळविण्याच्या कामाला तिनें वाहून घेतलें होतें.

★

## कॅप्टन लक्ष्मीची प्रतिज्ञा ★ ★ ५

२२ आक्टोबर, हा झांशीच्या राणीचा जन्मदिवस आहे. १९४३ सालीं राणीच्या या वाढदिवशीं, सुभाषबाबूंनीं, झांशीच्या राणीचें 'लक्ष्मी-पथक' स्थापन झाल्याचें जाहीर करण्याचें ठरविलें.

या पथकांतील हिन्दी स्त्रिया लष्करी गणवेषांत खांद्यावर बंदुका घेऊन रांगेत उभ्या होत्या. लक्ष्मीनें '**सावधान**' असा हुकूम दिला. नेताजींना लष्करी अभिवादन करण्यांत आलें. नंतर नेताजींनीं तिरंगी झेंडा उभारला आणि त्या राष्ट्र-ध्वजाला स्त्री-सैनिकांनीं प्रणाम केला. लक्ष्मीपथकाच्या छावणीचें उद्घाटन करून नेताजी म्हणाले,



"भगिनींनो!

आमचा प्राचीन इतिहास भव्य आणि वैभवपूर्ण आहे. येथें वैभवपूर्ण कर्तृत्वाची पूर्वपरंपरा नसती तर झांशीच्या राणीसारखी वीर-स्त्री आपल्या मातृभूमीच्या उदरीं जन्म पावली नसती. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत मैत्रेयी-सारख्या थोर स्त्रिया होऊन गेल्या. अहिल्याबाईचें स्फूर्तिजनक उदाहरण महाराष्ट्रांत घडलें आहे. बंगालची राणी भवानी, रझिया बेगम, नूरजहान या ब्रिटिश अंमला-पूर्वीच्या, अलीकडील इतिहासांत राज्यकारभारनिष्णात अशा स्त्रिया होऊन गेल्या. हिंदभूमींत विपुल वीरांगना निपजूं शकतात, याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. मला खात्री आहे, कीं स्त्री-जातींतील सर्वश्रेष्ठ पुष्पें मानल्या जातील, अशा स्त्रिया प्राचीन काळाप्रमाणें सध्यांच्या काळींहि निर्माण होतील!

१८५७ सालीं हिंदुस्थानच्या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामांत झांशीच्या राणी लक्ष्मीबाईनें परकीय सत्तेविरुद्ध क्रांतीसेना लढविली. झांशीची राणी पराजित झाली असली तरी अशा अनेक 'झांशीच्या राण्यां'ना हिंदुस्थान जन्म देऊं शकतो. पूर्व आशियांतील भारतीय महिला आतां संघटित झाल्या आहेत आणि आतां त्यांनीं स्वतःचें सैन्य बनविलें आहे. 'झांशीची राणी सेना' हें त्यांचें पथक आझाद हिंद फौजेचा एक भाग म्हणून मानलें जाईल."

याच प्रसंगीं नेताजींनीं या नव्या सेनेच्या सेनापती म्हणून, डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन् यांची नेमणूक केली. आझाद हिन्द सरकारच्या त्या आधींच मंत्री होत्या. आतां त्या कॅप्टन झाल्या! त्यांनीं शपथ घेतली.—

" ईश्वराचें नामस्मरण करून, मी शपथ घेतें कीं हिंदुस्थान व त्यांतले माझे चाळीस कोटी देशबांधव यांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं, प्रसंगीं मी माझे प्राण सुद्धां पणास लावीन!"

★

## रक्तानें लिहिलेला अर्ज ★ ★ ६

कॅ. लक्ष्मी यांनीं झांशीच्या राणी पथकाची सारी जबाबदारी आपल्या शिरावर घेतली, तेव्हां त्या पथकांत १८५ स्त्रिया होत्या. या सैनिकांना सर्व प्रकारचें शिक्षण देण्यांत येत असे. पिस्तुल, बंदुक, मशिनगन्स् आणि ब्रेनगन्स्, यांसारखीं शस्त्रें वापरण्याचें शिक्षणही दिलें जाई. प्रथमतः बऱ्याचशा स्त्रियांना शुश्रुषेचें काम शिकविलें जाई आणि आझाद हिन्द फौजेला जोडलेल्या औषधोपचार खात्यांत त्यांना नेमण्यांत येत असे. हळूहळू या पथकांतील स्त्री-सैनिकांची संख्या दोन हजारांवर पोंचली. परंतु नुसती संख्या वाढवून व केवळ वैद्यकीय मदत करून लक्ष्मीचें समाधान झालें नाहीं. त्यांना प्रत्यक्ष रणांगणावर

शौर्य गाजवून दाखवावयाचें होतें. म्हणून त्यांनीं आपल्या रक्तानें अर्ज लिहून नेताजींकडे पाठविला.

"आमचें शिक्षण समाधानकारक झालें असून भारत-मातेला स्वतंत्र करण्यासाठीं, आम्ही प्राण अर्पण करण्याचा निर्धार केला आहे. तुम्ही आम्हाला शूर झांशीची राणी म्हणून संबोधितां! ज्यावेळीं तुम्ही आमची लष्करी छावणी उघडली त्यावेळीं, आम्हाला त्या शूर राणीसारखें घनघोर लढाईत लढायला मिळेल म्हणून आश्वासन दिलें. आम्ही लढणाऱ्या सैनिकांत असल्याचें शत्रूच्या नजरेस पडलें, कीं शत्रूचा धीर खचेल आणि ब्रिटिश सैन्यांतून हिंदी सैनिक मागें जातील असें तुम्ही सांगितलें.

तुम्ही आम्हांला शिकविलें, कीं स्त्री–पुरुषांत फरक नाहीं. नेताजी! मग आम्ही अशा रणांगणापासून दूर कां? आम्ही चालून जातों शत्रूवर! निःपात करतो दुष्मनाचा!! रणां-गणाच्या आघाडीवर जाण्याचा ताबडतोब हुकूम द्या! नेताजी! नाहीं म्हणूं नका!!"

## निःशंक चालली युवती रणा! ★ ७

रक्तानें लिहिलेला हा अर्ज नेताजींनीं वाचला! त्यांना परमानंद झाला! त्यांनीं विनंती मान्य केली! हुकूम सुटला! झांशीच्या राणी पथकांतील दोन तुकड्यांना आघाडीवर जाण्याची परवानगी मिळाली.

कॅ. लक्ष्मी रणभूमीवर जाण्याला निघाल्या.

त्या आघाडीवर पोंचल्या तेव्हां पुरेसा शिधा नव्हता, कपडे पुरेसे नव्हते व दारूगोळाही मुबलक नव्हता. दऱ्या-खोरीं व जंगलें यांचा प्रदेश होता तो ! स्त्रिया लढणार आहेत, ही बातमी कळतांच दूरदूरच्या खेड्यापाड्यांतून हजारों आबालवृद्ध स्त्रीपुरुष तें अपूर्व दृश्य पहाण्यास धावत आले.

एके दिवशीं पहांटे कूच करण्याचा हुकूम झाला ! ब्रिटिश सैन्य मैलभर अंतरावर होतें. तें चाल करून आलें. कॅ. लक्ष्मी व इतर महिलांनीं त्यांच्यावर चाल केली. दारूगोळ्याचा भडिमार केला. "जय हिंद", "इन्किलाब झिंदाबाद", "आझाद हिन्द झिंदाबाद" असे जयघोष करीत त्या वीर महिलांनीं तोफांचा भडिमार सारखा चालू ठेवला.

कॅ. लक्ष्मीची पलटण विजयी झाली ! हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांच्या सरहद्दीवर झालेल्या या लढाईंत या झांशीच्या राणीच्या अवतारांनीं शत्रू-सेनेला शरण यावयास लावलें !

मौलमीन येथें आझाद हिन्द फौज माघार खात असतां कॅ. लक्ष्मी यांच्या 'झांशी राणी पथकानें' शत्रू फौजेशीं निकराचा सामना देऊन नेताजी सुभाष बोस यांना निसटून जाण्याची संधि दिली नि मगच कॅ. लक्ष्मी ब्रिटिश फौजेकडून पकडल्या गेल्या.

★



ब्रिटिशांनीं सिंगापूरचा पुन्हा कबजा घेतल्यानंतर तेथील आझाद हिंद सैनिकांना कैद करण्यांत आलें. कॅ. लक्ष्मीलाही स्थानबद्ध करण्यांत येऊन तिच्या हालचालीवर निर्बंध घालण्यांत आले. तिचा मोफत दवाखाना बंद करण्यांत आला. आझाद हिंद सैनिकांची

चौकशी जेव्हां शुरू झाली तेव्हां एका लष्करी ब्रिटिश अधिकाऱ्यानें तिला चिडविण्यासाठीं विचारलें,

"आतां जर तुमच्या हातांत पिस्तूल
दिलें तर तुम्ही काय कराल?"
कॅप्टन लक्ष्मीचा चेहरा लाल झाला!
आणि बेधडकपणें तिनें उत्तर दिलें—
"तसं झालं तर क्षणाचाही विलंब न करतां
मी तुम्हांला येथल्या येथें गोळीनें उडवून देईन."

★

## "मी ब्रिटिशांना मदत केली नाहीं" ★ ९

ब्रिटिशांनीं जपानचा व ब्रह्मदेशाचा ताबा घेतल्यानंतर 'कॅ. लक्ष्मी शरण आल्या असून, ब्रिटिशांना मदत करीत आहेत' अशी एक बातमी पसरली होती. लक्ष्मीनें ता. १८ आक्टोबर रोजीं रंगूनहून लिहिलेल्या पत्रांत या बातमीचा इन्कार केला आहे. ती लिहिते:—

"मी ज्या रेजिमेंटचीं कमांडर होतें त्या रेजिमेंटचें कांहीं दिवसांनंतर विसर्जन करण्यांत आलें. माझ्या शरणागतीनंतर भारतीय अनाथ नागरिकांना वैद्यकीय मदत देण्यापलीकडे मी ब्रिटिशांना मदत केली असें म्हणतां येईल, असें एकहि कृत्य माझ्या हातून घडलेलें नाहीं. शरणागतीनंतर केव्हांही मी ब्रिटिशांना मदत केलेली नाहीं.

शरणागतीनंतर एका ब्रिटिश गनिमी पथकाच्या हेडक्वार्टर्समध्यें मला ठेवण्यांत आलें. तेथें सुमारें शंभर निराधार नागरिक होते. त्यांत बहुतेक गुरखा स्त्रिया आणि मुलें यांचाच भरणा जास्त होता. ही मंडळी लगतच्या खेड्यापाड्यांतून पळून आलेली होती. त्यांतील बरीचशी आजारी होती. "त्यांना आपण वैद्यकीय मदत द्याल का?" असें कमांडिंग ऑफिसरनें मला विचारलें, तेव्हां मी 'हो' म्हटलें.

पण हा होकार मी आझाद हिंद फौजेची अधिकारी म्हणून दिलेला नाहीं.

त्या कॅम्पमध्यें तीन आठवडे ठेवल्यानंतर मला रंगूनमध्यें आणण्यांत आलें, व दीड महिना निर्बंधांत ठेवण्यांत आलें. यावेळीं "ब्रिटिश मेडिकल हॉस्पिटलांत आपण तूर्त काम कराल का?" असें मला विचारण्यांत आलें, तेव्हां मी साफ नकार दिला."

★

## मातृभूमीला आगमन ★ ★ १०

कॅ. लक्ष्मी युद्धाच्या अखेरच्या दिवसांत लष्करी कामाऐवजीं घायाळ सैनिकांची शुश्रुषा करीत होती म्हणून तिचेवर खटला न भरतां तिला बंधमुक्त करण्यांत आलें व हिंदुस्थानांत जाण्याची तिला परवानगी देण्यांत आली. बंधमुक्त झाल्यानंतर ता. २१ आक्टोबरला रंगूनमध्यें आझाद हिन्द फौजेचा स्मृतिदिन विराट प्रमाणांत साजरा झाला. त्यावेळीं कॅ. लक्ष्मी म्हणाली—

"मी अद्यापही आझाद हिन्द फौजेची सदस्य आहें. आपल्याला तीन मुख्य गोष्टींची विस्मृति कधींही पडतां उपयोगी नाहीं.

स्वातंत्र्यार्थ ज्यांनीं प्राणत्याग केला
त्यांना श्रद्धांजलि अर्पण करूंया !

लक्षांत ठेवा, आपले नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यापाशीं आपण प्रतिज्ञा केली आहे कीं, 'स्वातंत्र्य मिळेपर्यंत आराम नाहीं !" आणि तिसरी गोष्ट, आतां हिंदी लढा हिंदुस्थानाबाहेर नाहीं. हिंदुस्थानांत जाऊन हिंदवासीयांची संघटना करून शत्रूला हिंदुस्थानाबाहेर हाकलून द्यावयाचें आहे आपल्याला !"

ता. ३ मार्च १९४६ रोजीं त्या शाही विमानानें कलकत्त्याला आल्या. तेथें सुभाषबाबूंचे पुतणे श्री. रणजितकुमार बोस व श्री. प्रदीपकुमार बोस व त्यांच्या दोन बहिणी शीला व ललिता यांनीं त्यांचें स्वागत करून त्यांना आपल्या घरीं आणलें. लगेच त्यांनीं सुभाषबाबूंच्या खोलींत जाऊन त्यांच्या फोटोस वंदन केलें.

त्यावेळीं त्याच्या डोळ्यांतून अश्रु ओघळत होते. रात्रौ त्या तेथेंच राहिल्या व ता. ४ ला सायंकाळीं विमानानें दिल्लीला गेल्या. तेथें कॅ. सेहगल, आझाद हिन्द फौजेंताल कांहीं सैनिक व कॉंग्रेस कार्यकर्ते यांनीं त्यांचें थाटाचें स्वागत केल्यावर ती आपल्या आईला कडकडून भेटली. मायलेकींची ही भेट साडेपांच वर्षांनंतर झाली !



ता. १९ मार्च रोजीं कॅ. लक्ष्मी दिल्लीहून विमानानें मुंबईला आल्या व २० रोजीं आपल्या आजीला भेटण्यासाठीं मद्रासला गेल्या. पत्रकारांना मुलाखत देतांना त्या म्हणाल्या,

"मी लक्ष्मी शिपाई आहे. लष्करी शिपायाचें हिंसा हेंच तत्त्व होऊं शकेल. अहिंसा हें फार तर धोरण म्हणून अवलंबितां येईल."

★

## गुणगौरव ★ ★ ★ ११

आझाद हिन्द सैन्यांतील लक्ष्मीची कामगिरी अवर्णनीय आहे. तिची अत्यंत धाडसी वृत्ती, अतुल पराक्रम, आणि तिचें दांडगें व्यक्तिमत्त्व दिसून आल्यामुळेंच तिला झांशीच्या राणी पथकाची मुख्य बनविण्यांत आली होती.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं जीवनसर्वस्वावर तिलांजलि वाहिलेल्या स्त्रिया रणांगणावर शौर्य गाजवूं शकतात, हें राणी लक्ष्मीबाईनंतर कॅ. लक्ष्मीनें पुन्हां एकदां दाखवून दिलें आहे. **'जय हिन्द' 'चलो दिल्ली'** इत्यादि घोषणा करतांना लक्ष्मीच्या शरीरांतील रोमरोमांत उसळी येत असे.

कॅ. लक्ष्मीवर अनेक निर्बंध घालण्यांत आले. परंतु त्या निर्बंधांना तिनें भीक घातली नाहीं. तिच्या स्वभावांतच तें नाहीं! साध्या स्त्रीचे आदिमातेंत रूपांतर झालें होतें! चित्रकला, साहित्यकला, संगीतकला यांचा त्रिवेणीसंगम झालेल्या वंशसरितेंत लक्ष्मीचा जन्म झालेला असल्यामुळें या कलासंगमांतूनच या आदितेजाची निर्मिती झाली!

कॅ. लक्ष्मी सांसारिक माया मोहांत अगतिकपणें फार काळ राहूं शकली नाहीं. विलासांत लहानपणचें जीवन व्यतीत करूनहि ती विलासी वातावरणांत गुंतून पडली नाहीं. लहानपणापासून अंगांत सळसळणाऱ्या तेजोर्मीला सिंगापूर येथें विकासशील स्वरूप मिळालें आणि शौकिन व कलावंत घराण्यांत जन्मलेली विलासिनी शत्रूचा निःपात करणारी विध्वंसिनी म्हणून जगापुढें आज उभी आहे!

प्रथम कॅप्टन-नंतर मेजर व अखेर लेफ्टनंट कर्नल लक्ष्मी हिनें भेट दिली नाहीं अशी ब्रह्मदेशांत एकही युद्धआघाडी नव्हती. हिंदी स्त्रियांना मार्गदर्शन करूं शकतील असे आदर्श नेतृत्वाचे गुण लक्ष्मींत वास करीत आहेत. भारताच्या इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न करणाऱ्या वीर महिलांतील या अग्रगण्य महिलेच्या कामगिरीनें भारतीयांचा आत्मा फुलून आल्याशिवाय रहाणार नाहीं !

**ज्या भारतांत लक्ष्मीसारख्या राष्ट्रकन्या जन्म घेतात तो भारत धन्य होय! आणि तो भारत स्वतंत्र होणारच!! आणि लौकरच होणार!!**

## कॅप्टन लक्ष्मीचा संदेश ★ ★ १२



**पूर्व आशियांतील तीस लाख हिंदी लोकांना जात, धर्म किंवा पंथ असले सर्व भेदभाव विसरून कार्य करण्याची प्रेरणा देणाऱ्या नेताजींनीं निर्मिलेला ज्वलंत उत्साह तसाच कायम राखण्याचें कार्य तुम्ही चालू ठेवाल असा मला विश्वास वाटतो. परदेशांच्या सहाय्यानें हिन्दी स्वातंत्र्य मिळण्याची अपेक्षा करणं निरर्थक असून हिंदुस्थानला ध्येयाप्रत नेण्याच्या बाबतींत आमच्या स्वतःच्या आंतरिक सामर्थ्यावरच आम्ही विसंबून राहिलें पाहिजे.**

**चलो दिल्ली! चलो विजय पन्थे!!**

**जय हिन्द!!!**

Lakshmi Swaminathan
Lt. Col.
[illegible]

IRBK-0102522

# रायकर-टिल्लू यांची साहित्य संपदा

## जय हिंद
## नेताजी सुभाष

देशगौरव बाबू सुभाषचंद्र बोस, यांचे अद्यावत चरित्र, आझाद हिंद फौज व त्या फौजेचें ऐतिहासिक कार्य, 'जयहिंद' 'चलो दिल्ली' ह्या घोषणांचे राष्ट्रीय स्वरूप, लाल किल्ल्यांतील खटल्याचा वृत्तांत, वगैरे जिवंत रसानें लिहिलेला ताजा इतिहास. अनेक दुर्मिळ फोटो. **तिरंगी फोटो मुखपृष्ठावर:**

**मूल्य सव्वा रुपया**

★

## जयहिंद गीतें

हिंदुस्थानचा स्वातंत्र्य संग्राम अजून संपला नाही खरा व शेवटचा संग्राम अजून पुढेंच आहे. पंटानाई मर्द बनविणारीं हीं गीतें प्रत्येक हिंदी व्यक्तीनें पाठ करून ठेवल्यास आगामी हिंदी स्वातंत्र्य संग्रामांत चांगलीं उपयोगी पडतील. नमुनेदार स्फूर्ती गीतें.
**तिरंगी मोहक मुखपृष्ठ:**

**मूल्य चार आ**

★

## सिनेमांतील
## गोड गाणीं

रस्त्यावरच्या भिकाऱ्यापासून तो राजवाड्यांतील गायिकापर्यंत सर्वांच्या तोंडीं—हल्लीं सिनेमांतील गोड गाणीं खेळत असतात. मानवी जीवनांत गाणीं ही अजब चीज आहे लोकप्रिय मराठी बोलपटांतील गोड गाण्यांचा हा नमुनेदार संग्रह प्रत्येक रसिकाला आपल्या संग्रहीं हवासाच वाटेल.
**तिरंगी अर्थपूर्ण मुखपृष्ठ:**

**मूल्य आठ आणे**

★

## सेवादल-गीतें

संघटनेचें, शिस्तीचें व लढाऊ राष्ट्रीय वृत्तीचें शिक्षण परिणामकारक होण्यासाठी हीं सोप्या चालींचीं कूच-गीतें झण्डागीतें युद्धगीतें, आणि लोकगीतें भारतांतील प्रत्येक व्यक्तीनें तोंडपाठ करायलाच हवीत! राष्ट्रीय गीतांचा एकत्रित आणि उपयुक्त संग्रह—**तिरंगी नवलपूर्ण मुखपृष्ठ:**

**मूल्य सहा आणे**

**● ● ● सर्वत्र मिळतात**